**RNI No. MAHBIL /2009/37831**

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार—ब

**वर्ष ३, अंक १४८(३)]** **बुधवार, नोव्हेंबर १, २०१७/कार्तिक १०, शके १९३९** **[पृष्ठे ३, किंमत : रुपये ९.००**

**असाधारण क्रमांक ३५७**

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र अधिनियमांन्वये तयार केलेले**
**(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

**गृह विभाग**

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक १ नोव्हेंबर २०१७

**अधिसूचना**

**महाराष्ट्र दारूबंदी अधिनियम.**

क्रमांक एमपीएल-०७१७/प्र.क्र.२१४(२)/राउशु-३.—ज्याअर्थी, मुंबई मळी नियम, १९५५ यामध्ये आणखी सुधारणा करण्याकरिता पुढील नियम तात्काळ अंमलात आणण्यात यावेत आणि म्हणून महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम (१९४९ मुंबईचा पंचवीस) च्या कलम १४३ च्या पोट-कलम (३) च्या परंतुकाद्वारे तरतूद केल्याप्रमाणे पूर्व प्रसिद्धीशिवाय हे नियम तयार करण्यात यावेत, असे महाराष्ट्र शासनास वाटते.

त्याअर्थी, आता, महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम (१९४९ मुंबईचा पंचवीस) कलम १४३ च्या पोट-कलम (१) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा आणि याबाबतीत त्यास समर्थ करणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करून महाराष्ट्र शासन, याद्वारे बॉम्बे मळी अधिनियम, १९५५ यात सुधारणा करण्यासाठी पुढील नियम करीत आहे, ते असे :—

१. या नियमांना, बॉम्बे मळी (सुधारणा) नियम, २०१७ असे संबोधण्यात यावे.

२. मुंबई मळी नियम, १९५५ च्या नियम १३ (यापुढे ज्याचा उल्लेख " मूळ नियम " असा केलेला आहे), च्या पोट-नियम (१) मध्ये "रुपये पन्नास " या शब्दांऐवजी, "रुपये पाच हजार " असे वाचण्यात यावे.

३. नियम १५ च्या पोट-नियम (१) मध्ये "रुपये पन्नास " या शब्दांऐवजी, "रुपये पाच हजार " असे वाचण्यात यावे.

४. नियम १९ च्या पोट-नियम (१) मध्ये —

(अ) "वाहतूक करण्यात यावयाच्या मळीच्या प्रत्येक मेट्रीक टना मागे रुपये एक" या शब्दांऐवजी "वाहतूक करण्यात यावयाच्या मळीच्या प्रत्येक मेट्रीक टना मागे रुपये पाचशे" असे वाचण्यात यावे.

(ब) पोट-नियम (१) नंतर खाली परंतुक अंतर्भूत करावे, ते असे :—

"परंतु, आयात व निर्यात होणाऱ्या मळीची वाहतूक करताना एम-६ परवान्यासाठी रुपये पाचशे प्रति मेट्रीक टन इतके अतिरिक्त वाहतूक शुल्क आकारण्यात यावे."

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**पु. हि. वागदे,**
शासनाचे सहसचिव.

## HOME DEPARTMENT

Madam Cama Marg, Hutatma Rajguru Chowk,
Mantralaya, Mumbai 400 032, dated the 1st November 2017.

*NOTIFICATION*

MAHARASHTRA PROHIBITION ACT.

No. MPL-0717/C.R.214(2)/EXC-3.—Whereas, the Government of Maharashtra considers that the following rule further to amend the Bombay Molasses Rules, 1955, shall be brought in to force at once, and therefore, the rules shall be made without previous publication as provided by the proviso to sub-section (*3*) of section 143 of the Maharashtra prohibition Act, 1949 (XXV of 1949) ;

Now, therefore, in exercise of the powers conferred by clause (*b*) of sub-section (*2*) of section 143 of the Maharashtra prohibition Act, 1949 (XXV of 1949) and of all other powers enabling it in this behalf, the Government of Maharashtra hereby, makes the following rules, as follows, namely :—

1. These rule may be called the Bombay Molasses (*Amendment) Rules, 2017.

2. In rule 13 of the Bombay Molasses Rules, 1955 (hereinafter referred to as "the principal rules"), in sub-rule (1), for the words "of rupees fifty" the words "of rupees five thousand" shall be substituted.

3. In rule 15 of the principal Rules, in sub-rule (1), for the words "of rupees fifty" the words "of rupees five thousand" shall be substituted.

4. In rule of 19 of the principal Rules, in sub-rule (1),

(*a*) for the word "at the rate of rupees one per metric ton of molasses to be transported" the words "at the rate of rupees five hundred per metric ton of molasses to be transported" shall be substituted.

(*b*) After sub rule (1), the following proviso shall be added, namely :—

"Provided that on import and export of molasses an additional fee of rupees five hundred per metric ton will be applicable as transport fee for M-VI Permit."

By order and in the name of the Governor of Maharashtra,

P. H. WAGDE,
Joint Secretary to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004, EDITOR : SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI.